IFSIJ IMPACT FACTOR: 6.225 ISSN: 2455-1511

# SANSKRUTI

## International Multidisciplinary Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**Special Issue: 011 March - 2022**

---

**"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."**
**- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe**

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

## Kakasaheb Chavan College, Talmavale

Tal. Patan, Dist- Satara. 415103 (Maharashtra)

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

One Day Online

NATIONAL MULTIDISCIPLINARY CONFERENCE

On

# Women Empowerment and Globalization

Organized by

INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)

On

Sunday, 19th December 2021

**Special Issue Editor:** Prin. Dr. Arun Gade

**Guest Editor:** Prof. Mahendra Kadam-Patil

**Editor-in-Chief:** Prof. Santosh Bongale



Scanned with CamScanner

## Our Patrons

**Hon. Chandrakant (Dada) Patil**
President,
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

**Hon. Prin. Abhaykumar Salunkhe**
Executive Chairman,
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

**Hon. Prin. (Mrs.) Shubhangi Gawade**
Secretary,
Shri SwamiVivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

**Hon. Prin. Dr. Rajendra Shejwal**
Joint Secretary (Admin.),
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

**Hon. Prin. Sitaram Gavali**
Joint Secretary (Finance),
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

## Coordinator

**Mr. Digambar Bhise**
Coordinator, IQAC

## Convener

**Dr. Arun Gade**
Prin., K. C. College, Talmavale

## Technical Assistance:

**Mr. Azharuddin Patel**

## Organizing Committee:

Dr. U. E. Salunkhe (9822908849)
Dr. G. N. Pote (9881621884)
Mr. S. K. Naik (9423860415)
Mr. V. V. Supugade (9822764224)
Mr. S. N. Sawant (9049755701)
Mr. M. B. Chavan (9421004346)



Scanned with CamScanner

## Special Issue Index



| Sr. No. | Title of the Paper & Author's Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | *Micro Finance (Self Help Group) and Socio- Economic Development: A Micro Study*<br>*Prin. Mrs. Shubhangi Gawade, Dr. Ushadevi Eknath Salunkhe* | 12-21 |
| 2 | महिला सबलीकरण व प्रतिनिधीत्त्व आणि समानतेचा अधिकार<br>प्राचार्य डॉ. अरुण गाडे, प्रा. विशाल कांबळे | 22-34 |
| 3 | *Mrs. Warren's Entrepreneurship in Globalizing Scenario*<br>*Mr. Digambar M. Bhise, Dr. Tanweer K. Shaikh* | 35-38 |
| 4 | स्त्री-सबलीकरण आणि धार्मिक अडसर<br>प्रा. अशोक नथुराम डिंबर | 39-46 |
| 5 | महिला सक्षमीकरणाचा सशक्त विचार: 'यंग इंडियाचा ग्रुप सेल्फी'<br>प्रा. संदीप परदेशी | 47-50 |
| 6 | मध्ययुगीन संत कवयित्रींचे योगदान<br>प्रा. डॉ. सुनिल संभाजी साठे | 51-55 |
| 7 | वैदिक काल से लेकर वर्तमान तक भारतीय महिलाओं की दशा एवं दिशा<br>डॉ. सिद्धनाथ खजूरिया | 56-62 |
| 8 | महिला सबलीकरण व केतकरांच्या कादंबरीतील स्त्रिया<br>प्रा. डॉ. सौ. यू. आर. पाटील | 63-69 |
| 9 | *Impact of Self-help Groups' on Women Empowerment*<br>*Dr. Amol Gowardhan Sonawale* | 70-74 |
| 10 | *Women Empowerment in Dina Mehta's Brides are Not for Burning*<br>*Shaila Nagnath Chobe* | 75-80 |
| 11 | *Modern Reworking of the Legend of La Llorona in Sandra Cisneros' Woman Hollering Creek*<br>*Dr. Deepa S Patil* | 81-84 |
| 12 | *Startup India and Women Entrepreneurship: A New Regime for Economic Development*<br>*Mr. Yogesh Maruti Kharat* | 85-91 |
| 13 | *Feministic Ideology and Women Empowerment Through Literature*<br>*Dr. Anil K. Kate* | 92-97 |
| 14 | महिला सबलीकरण: काळाची गरज<br>प्रा. अभिजीत मनोहर शिंगाडे | 98-105 |
| 15 | भारतीय स्त्री आणि शिक्षण<br>शुभांगी बबन मेटे | 106-112 |





Scanned with CamScanner

Sanskruti International Multidisciplinary Research Journal
IMPACT FACTOR - (IFSIJ) – 6.225
Special Issue 011- "Women Empowerment and Globalization"
ISSN: 2455-1511
March- 2022

# महिला सक्षमीकरणाचा सशक्त विचार: 'यंग इंडियाचा ग्रुप सेल्फी'

**प्रा. संदीप परदेशी**
सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.

**प्रास्ताविक-**

लक्ष्मीकांत देशमुख यांना एक उत्तम प्रशासकीय अधिकारी म्हणून आपण सर्व परिचित आहोत. आपल्या प्रशासकीय कारकिर्दीचा उपयोग सामान्य जनतेच्या कल्याणासाठी करणे हे ध्येय बाळगून त्यांनी आपल्या या प्रशासकीय पदावर कार्य केले. समाजामधील महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांना ते सतत भीडत राहिले व ती सोडवण्याचा त्यांनी नेहमीच प्रामाणिक प्रयत्न केला. या प्रयत्नातूनच बेटी बचाव, साक्षरता अभियान, ई-चावडी योजना, रोजगार हमी योजना, बाल कामगारांचे प्रश्न, वाड्मयीन चळवळी असे विविध उपक्रम पूर्णत्वाला घेऊन जाणारा कुशल प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांची सर्वत्र ओळख आहे. उच्च पदावर कार्य करत असताना प्रशासनामधील भ्रष्टाचार, राजकारण, अधिकारी आणि राज्यकर्त्यांकडून शासन व्यवस्थेचा घेतला जाणारा गैरफायदा या सगळ्यांचे अनुभव त्यांना येत होते. प्रशासनात कार्य करत असताना वेगवेगळ्या समूहांशी त्यांचा संबंध आला. या समूहाची दुःख, त्यांचे प्रश्न जाणून घेता आले. गरीब-श्रीमंत वर्गाचे प्रश्न, सामान्य माणसाचे प्रश्न, त्यांचे दुःख, शोषण, वेदना या व्यवस्थेमुळे निर्माण झाले आहेत. त्या दूर करणे आपले काम आहे असे समजून त्यांनी प्रशासकीय सेवा केली. हे करत असताना त्यांनी सामाजिक समस्यांचा वेध घेऊन नेहमी 'नाही रे' वर्गासाठी कार्य केले. हे करत असतानाच त्यांनी मोठ्या प्रमाणात साहित्य लेखनही केले. या साहित्यामधून ही त्यांनी ज्वलंत सामाजिक समस्यांची मांडणी केली.

लक्ष्मीकांत देशमुख यांना साहित्य क्षेत्रात खरी ओळख 'इन्किलाब विरुद्ध जिहाद' या कादंबरीने मिळवून दिली. या कादंबरीतून त्यांनी 'आंतरराष्ट्रीय दहशतवाद' हा एक व्यापक विषय समोर आणला. यासोबतच 'अंधेर नगरी' या कादंबरीतून त्यांनी प्रशासनातील भ्रष्टाचार मांडला. 'हरवलेले बालपण' यातून बालमजुरी ही एक वैश्विक समस्या प्रभावीपणे चित्रित केली. 'सलोमी' कादंबरीतून मुस्लिम स्त्रियांच्या जीवनाचा वेध घेण्याचे काम केले. यासोबतच त्यांनी आपल्या



Scanned with CamScanner

कथासंग्रहांमधून पाणीप्रश्न, मुलींची गर्भातच होणारी हत्या असे महत्त्वाचे प्रश्न समाजासमोर आणले. याबरोबरच प्रशासकीय लेखन,ललित लेखन, नाटक अशा विविध पातळीवरचे लेखन देशमुख यांनी केले.

२०१८ मध्ये त्यांनी **'यंग इंडियाचा ग्रुप सेल्फी'**ही कादंबरी लिहिली. या कादंबरीच्या माध्यमातून आजच्या जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या काळात समाजाची अवस्था विशेषतः आजची तरुणाई, या तरुणांची विचार करण्याची क्षमता, यासोबतच जे सामाजिक बदल या काळात घडत आहेत या बदलांचा मानवी जीवनावर होत असलेला परिणाम आणि यातून महिला सक्षमीकरणाचा एक प्रभावी विचार त्यांनी प्रस्तुतच्या कादंबरीच्या माध्यमातून मांडलेला आहे.

या कादंबरीमधील लक्ष्मीकांत देशमुख यांनी महिला सक्षमीकरणाचा मांडलेला प्रभावी विचारांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

**कथानकातील महिला सक्षमीकरणाचा विचार-**

कादंबरीच्या कथानकाचे एक महत्त्वाचे वेगळेपण म्हणजे स्री सक्षमीकरणाचा मांडलेला एक सशक्त विचार होय. या कादंबरीत चित्रित केलेली स्त्री ही आपल्या जीवनाला सक्षमतेने सामोरे जाताना दिसते. त्यासोबतच त्यांचे सहकारी पुरुष पात्रेही त्यांना समर्थपणे साथ देण्याचे काम करतात. हा विचार नवीन आहे. ज्योतीच्या प्रेमामध्ये असणारे जीवनाचे सामर्थ्य, देशावर प्रेम करणारी आणि तितकेच प्रियकर असणाऱ्या मनोहरवर ही प्रेम करणारी आणि देशातच नोकरी कर अन्यथा आपल्या विवाहाला नाकारणारी मीनलची धिटाई, सारिका भोईटे ही तर या कादंबरीतील महिला सशक्तीकरणाचे आदर्श उदाहरणच आहे. कृषिनिष्ठ जीवन स्वीकारून ग्रामीण भागाचा संपूर्ण विकास अशी जणू तिने प्रतिज्ञा घेतली आहे. त्यातूनच तिने साकारलेली सरपंचाची भूमिका आणि तिने गावाला मिळवून दिलेलं राष्ट्रपतींच्या हस्ते 'निर्मल गावाचं पारितोषिक' यातून तिची कर्तबगारी दिसून येते. अनन्याची निसर्गाप्रती असणारी निष्ठा आणि शेखर सोबतचे तिचे कार्य प्रशंसनीय आहे. सुभद्राने शिक्षकी पेशा सोबतच स्वतःची संस्था काढून मुलींना शिक्षित करण्याचा घेतलेला ध्यास सावित्रीबाईंच्या वळणाचा कसा आहे, या एकापेक्षा एक वरचढ असणाऱ्या स्त्री कर्तव्यांची नोंद ही कादंबरी घेते. स्त्रियांच्या कर्तबगारी सोबतच त्यांना समानतेची वागणूक देणाऱ्या पुरुष वर्गाचे ही व्यक्तिमत्त्व या कादंबरीत प्रामुख्याने दिसते.



Scanned with CamScanner

ISSN: 2455-1511
March- 2022

जागतिकीकरणाच्या आजच्या काळात स्त्रीचे स्वावलंबन, तिचं सशक्तिकरण, पारंपारिक चौकटीला तिने दिलेला तडा तसेच पुरुषाच्या बरोबरीने स्वतःला सिद्ध करणारी कर्तव्यनिष्ठा वाचकांचे लक्ष वेधून घेणारी आहे. संजय आणि त्याची पत्नी यांच्या नात्यातील समानता पाहता ते कसे मेड फॉर इच अदर आहेत हा विचार पुढे येतो. संजय ची समर्पकता आणि ज्योती ची कर्तव्यनिष्ठा या कादंबरीत रेखाटली आहे. संजय ज्योतीला तिच्या बदलीच्या संदर्भात म्हणतो, "तर तर क्षणभर थांबून.. संजय ठामपणे शांत स्वरात म्हणाला, "माझी त्याला मुळीच हरकत असणार नाही. हा तुझ्या विरहाचा त्रास सहन करावा लागेल एवढेच, पण तो त्रास दुतर्फा असेल, तुझ्या इतकाच मलाही, पण स्त्रीनं आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असलं पाहिजे आणि तिला स्वतःची स्पेस किंवा तिसरा कोपरा हक्काने मिळालाच पाहिजे आणि ही बाब एक समतेचा छोटा पाईक असलो तरी माझ्यासाठी नॉन निगोशिएबल आहे."[1]

संजयचा हा विचार स्त्रीला उभारी देण्यासोबतच तिच्याबद्दल आदर व्यक्त करणारा आहे. संजय आणि ज्योती च्या नात्यातील समानता ही आदर्श जीवनाची वाटचाल म्हणावी लागेल.

कादंबरीतील 'सारिका भोईटे' हे स्त्री पात्र म्हणजे महिला सक्षमीकरणाचे एक प्रभावी उदाहरण म्हणता येईल.सारिका भोईटे ने बारावीनंतर औरंगाबादला हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स केला व ताजमध्ये मिळालेली नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय करायचं ठरवलं. तीने तीन हॉटेल्स सुरु केली आणि ती यशस्वीरीत्या चालवली. तरीही तिने पाडळी हे आपलं गाव या गावाशी असलेले ऋणानुबंध तसेच जपून ठेवले. पाच वर्षापूर्वी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण स्री प्रवर्गाचं निघालं तेव्हा संपूर्ण गावाने तिने ग्रामपंचायतीची निवडणूक लढवावी व सरपंच बनावं असं ठरवलं. तिच्याकडे तो आग्रह धरला. सारिकाच्या वडिलांची त्याला संमतीही मिळाली. तिनेही विचार करून मान्यता दिली आणि अक्षरशः सरपंच पदाचा काळ तिने आपल्या कर्तबगारीने गाजवला. मराठवाड्यातील पाडळी गाव घरोघरी मोजून पाणी देणारं त्यावर आधारित पाणीपट्टी आकारणार राज्यातलं पहिलं गाव बनलं. मग तिने गाव हागणदारी मुक्त करून राष्ट्रपतींच्या हस्ते निर्मल गावाचं पारितोषिक मिळवलं. सेलू तालुक्यातले निर्मल झालेलं ते पहिलं गाव होतं.

सारिकाची केवळ मराठवाडाच नाही तर अख्ख्या देशाला ओळख झाली, ती दररोज घोड्यावरुन जीन्स टी-शर्ट मध्ये गावात फिरून काम करणारी सरपंच म्हणून आणि जोडीला लागोपाठ तीन वर्ष राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती म्हणून. वडीलांमुळेच लहानपणापासून घोडेस्वारी शिकलेली सारिका सरपंच म्हणून जीप किंवा बाईक ऐवजी गावात



Scanned with CamScanner

येण्यासाठी घोडा वापरते. एकदा तिने घोड्यावरून जात चोरट्या गावठी हातभट्टीच्या दारू अड्ड्यावर धाड घालून झाशीच्या राणीच्या आवेशात तो उद्ध्वस्त केला होता, तेव्हा एका प्रेक्षकाने मोबाईल कॅमेरा वर दहा मिनिटाच तिचं ते धाडसी कृत्य टिपलं व युट्युब वर टाकलं. त्याला अल्पावधीतच लाखो लाईक मिळाल्या होत्या. संजयन तिच्यावर मग 'घोड्यावरून फिरणारी धाडसी महिला सरपंच' या नावाचा लेख एका मोठ्या वर्तमानपत्रात लिहिला. तो इंग्रजी-हिंदीत अनुवादित करून छापला गेला आणि ती संपूर्ण देशाची एक महिला आयकॉन बनली.

**सारांश-**

'यंग इंडियाचा ग्रुप सेल्फी' ही कादंबरी आजच्या तरुणांचं भावविश्व, या विश्वातील त्यांचे विचार, चंगळवादी प्रवृत्ती, नातेसंबंध यासर्वांचा विचार करते. लक्ष्मीकांत देशमुख यांनी या कादंबरीत महिला सक्षमीकरणाला महत्त्व देऊन यातील प्रत्येक स्री स्वतःचे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत संसारला व आपल्या कुटुंबाला जिवापेक्षाही जास्त जपते. तिच्या कर्तृत्वाची भरारी आजच्या माणसाला निश्चितच गौरवान्वित करणारी आहे आणि तिचा सोबती असणारा तिचा पती ही बदलत्या प्रवाहाप्रमाणे तिला कसा जपतो आणि जोपासतो हेही या कादंबरीला मौलिकता देऊन जाते.

सेलू गावचा हा सेल्फी ग्रुप खऱ्या अर्थाने मानवी मूल्याचा हितसंरक्षक असतो आणि तो आपल्या कार्यानुसार स्वतःला, समाजाला व महिलांना कसा विकसित करू पाहतो हा विचार म्हणजे कादंबरीतील महिला सक्षमीकरणाचा विचार असल्याचे जाणवते.

**संदर्भ ग्रंथ-**

१. देशमुख लक्ष्मीकांत- यंग इंडियाचा ग्रुप सेल्फी, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.,पुणे. प्र. आ.२०१८.



Scanned with CamScanner